## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र.१५८२/२०२२/अहमदनगर मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.किरण शिवाजी गवळी,<br>मु.पो.सुपा C/O आप्पासाहेब व्यापारी संकुल,राहुल होंडा शोरुम, ग्रामपंचायत कार्यालय जवळ,सुपा, ता.पारनेर, जि.अहमदनगर-४१४३०१. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर. | सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पारनेर, ता.पारनेर, जि.अहमदनगर. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**<u>विवेचन</u>**

अपिलार्थी यांनी दिनांक २३/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये दि.०१ एप्रिल २०१७ ते दि.३१ मार्च २०१८ या कालावधीतील ग्रामपंचायत शहाजापूर यांनी वरील वित्तीय वर्षाचे कार्यकालामध्ये प्राप्त ग्रामनिधीतुन शासकीय नियमावलीस अधिन राहुन आगेबाबा मंदिर परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी ४५,०००/- रुपचे खर्च केलेले आहेत त्याबाबतची पूर्ण संचिकेची साक्षांकित प्रत मिळावी. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक ०३/०८/२०२२ रोजी खालीलप्रमाणे आदेशित केले होते.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३. सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर, ता.पारनेर, श्रीमती एस.बी.बोर्डे यांनी दि.१२/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये लेखी खुलासा आयोगास सादर केला आहे. सदर खुलाश्यात नमूद केले आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दि.१७/११/२०२१ च्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे. त्याबाबतची छायांकित प्रत आयोगास सादर करीत आहे. त्यामुळे माझे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये कोणत्याही प्रकारची शास्तीची कारवाई करण्यात येऊ नये ही विनंती. भविष्यात अशा प्रकारची घटना घडणार नाही याबाबत निश्चित योग्य खबरदारी घेण्यात येईल.

४.    प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर, ता.पारनेर, श्रीमती एस.बी.बोर्डे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे नमूद केले आहे. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती शुल्क कळवून अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरल्यानंतर देखील माहिती पुरविली आहे. उपरोक्त बाबी विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर, ता.पारनेर, श्रीमती एस.बी.बोर्डे यांनी केलेला खुलासा मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 29/01/2024

---

प्रती,

श्रीमती एस.बी.बोर्डे (तत्कालीन जन माहिती अधिकारी) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शहांजापूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

---

जावक क्र. आ-०e    दि. 01 FEB 2024